JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शालेय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची समस्या, कारणे व उपाययोजना

**Dr. Vaishali Jagannath Ragde (Jadhao)**
**Principal**
Late Narmadabai Bodkhe Adhyapak Mahavidyalaya, Telhara
Dist. Akola. (Maharashtra) India

शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बेशिस्त ही एक गंभीर समस्या बनली आहे. शाळा व महाविद्यालयातील मुलांच्या बेशिस्तीमुळे आज सर्व चिंतेचे व निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा, महाविद्यालये व समाज यावर त्याचे अनिष्ट परिणाम दिसू लागले आहेत. त्यामुळे देशाचे भवितव्य धोक्यात आले आहे. देशाचे भवितव्य घडविणारी ही तरुण पिढी आपल्या बेशिस्त वर्तनाने जर स्वतःचे व देशाचे नुकसान करीत असेल तर ते फार मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. म्हणून या शालेय बेशिस्तीची कारणमीमांसा करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने व सामाजिक संस्थांनी वेळोवेळी शालेय बेशिस्तीचा अभ्यास केला आहे.

शिक्षणतज्ज्ञांच्या विविध समित्यांनी विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची निर्माण झालेली जी समस्या आहे तिचे निराकरण करण्यासाठी त्याची कारणे शोधताना प्रमुख तीन घटकांचा प्रामुख्याने विचार केला आहे. ते तीन घटक म्हणजे १) कुटुंब २) शाळा ३) समाज.

**शालेय बेशिस्तीबाबत कौटूंबिक कारणे :**

१) कुटूंबात लोकशाही वातावरण नसणे.

२) कुटूंबात विद्यार्थ्यांच्या गरजांची पूर्ती न होणे.

३) शिक्षणाबाबत कुटूंबाची उदासीन वृत्ती.

४) व्यसनाधीन कुटुंबे.

५) कुमारावस्थेचा कालावधी.

६) कौटूंबिक संस्कारांचा अभाव.

७) कुटूंबात मानसिक स्वास्थ नसणे.

**शाळा व महाविद्यालयासंबंधी बेशिस्तीची कारणे :**

१) शालेय सुविधांचा अभाव

२) शिक्षकाची हुकुमशाही वृत्ती

३) शिक्षकांची पक्षपाती वागणूक

४) व्यासंगी व अध्यापनकुशल शिक्षकांचा अभाव

५) विद्यार्थी – शिक्षक संबंध

६) सदोष अभ्यासक्रम

७) सदोष शैक्षणिक धोरण

**विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची सामाजिक कारणे**

१) समाजातील भ्रष्टाचार

२) बेरोजगारांचे वाढते प्रमाण

३) विकृत राजकारण

४) आर्थिक विषमता

५) सामाजिक विषमता

६) सामाजिक अन्याय

७) योग्य आदर्शांचा अभाव

अशाप्रकारे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची जी बेशिस्तीची समस्या भेडसावत आहे. त्याची कारणे आपण पाहिलेली आहे. बेशिस्तीची समस्या ही अतिशय गंभीर बनत चाललेली आहे. या समस्येचे निराकरण करुन त्यावर उपाययोजना करणे अगत्याचे ठरते. जेणेकरुन या बेशिस्तीवर आळा बसू शकेल.

शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे बेशिस्त वर्तन समूळ नष्ठ करण्यासाठी काही सर्वसामान्य व उपयुक्त उपाययोजना पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) शाळा व महाविद्यालयातील अध्यापकांचे दर्जेदार अध्यापन :**

अध्यापकांनी आपला विषयव्यासंग वाढवून दर्जेदार अध्यापन करावे. अध्यापनात विविध दृकश्राव्य साधनांचा वापर करावा. अध्यापनाची पूर्वतयारी उत्तमप्रकारे करुन सचेतन व परिणामकारक अध्यापन करावे. शैक्षणिक अनुभूतींची योग्य गुंफण करुन विद्यार्थ्यांचे बौध्दिक समाधान करावे.

**२) दत्तकपालक योजना :**

अलीकडे काही महाविद्यालयात दत्तक पालक योजना राबविली जाते. प्रत्येक अध्यापकांकडे विद्यार्थ्यांचा एक गट वर्षभर सोपविला जातो. या विद्यार्थ्यांनी आपली दैनंदिनी लिहून त्यावर प्राध्यापकांची सही घ्यायची असते. त्यामुळे ते विद्यार्थी प्राध्यापकांच्या सानिध्यात राहतात.

त्या विद्यार्थ्यांच्या समस्या, शंका व अडचणी प्राध्यापकाला समजतात. अभ्यासाव्यतिरिक्त तो आपला वेळ कसा घालवितो. याविषयी सर्व माहिती प्राध्यापकाला मिळते त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना त्यांच्या अभिरुचीप्रमाणे व कुवतीप्रमाणे मार्गदर्शन करता येते.

**३) अभ्यासपुरक कार्यक्रम :**

विद्यार्थ्यांच्या युवाशक्तीला योग्य वळण लागावे, त्यांच्या ठिकाणी सत्यप्रियता, प्रामाणिकपणा, विनम्रता, विवेकबुध्दी, सहकार्य भावना व सेवाभावी वृत्ती हे गुण विकसित व्हावेत म्हणून राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्रसेना, स्काऊट गाईड, बुलबुल हे अभ्यासपूरक कार्यक्रम सुरु करावेत.

**४) प्रौढ शिक्षणात सहभाग :**

सामाजिक जाबदारीची जाणीव व्हावी म्हणून प्रौढ शिक्षण कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सहभागी करुन घ्यावे. परिसरातील निरक्षरांना विद्यार्थ्यांनी शिकवून साक्षर करावे व साक्षरता अभियान कार्यक्रम उत्साहाने राबवावा. शाळा व महाविद्यालयांनी यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा द्याव्यात.

**५) कायद्याचे ज्ञान देणारे कार्यक्रम :**

शाळा, महाविद्यालयांत कायद्याचे महत्त्व पटवून देणारे कार्यक्रम आयोजित करावेत. लोकशाही समाजव्यवस्थेत कायदा व सुव्यवस्था यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे. कायद्याचे पालन कसे व का करावे हे त्यांच्या ध्यानात आणून द्यावे.

**६) व्यवसाय मार्गदर्शन :**

विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर कोणते व्यवसाय करता येतील. त्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत. याची कल्पना द्यावी. शाळा व महाविद्यालयात व्यवस्था मार्गदर्शन केंद्रे उभारुन विद्यार्थ्यांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविता येईल.

**७) जीवनाभिमुख व समाजाभिमुख शिक्षण :**

शाळा व महाविद्यालयातील शिक्षण केवळ पुस्तकी, परंपरानिष्ठ व ज्ञाननिष्ठ नसावे. समाज जीवनातील वाढत्या गरजा भागविण्याचे सामर्थ्य शिक्षणात यावे या दृष्टीने शिक्षण समाजाभिमुख व जीवनाभिमुख करावे. शिक्षण आणि जीवन यांची योग्य ती सांगड घालावी.

**८) पालकांचे सहकार्य :**

शाळा व महाविद्यालयांना आज पालकांच्या सहकार्याची फार गरज आहे. आज शिक्षण केवळ विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. शिक्षणात पालकांचे स्थान आता महत्त्वपूर्ण झाले आहे. बदलती शिक्षणपध्दती, नवीन अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या समस्या या बाबतीत पालकांचे सहकार्य घेऊन आपण योग्य तो मार्ग काढू शकतो.

**९) शाळा व महाविद्यालयीन कामकाजात विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे :**

गुणवत्तेच्या आधारावर किंवा निवडणुकीने विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयांच्या कामकाजात सहभागी करुन घ्यावे. त्यामुळे तो ज्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करतो त्यांचे प्रश्न, समस्या व अडचणी कळतील व त्यावर तत्पर उपाययोजना करता येईल.

**१०) शालेय सुविधांची उपलब्धता :**

शाळा व महाविद्यालयांत विविध शैक्षणिक साधने, प्रयोगाची उपकरणे, खेळाच्या वस्तू, पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावीत. त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण कराव्यात.

**११) शाळा व महाविद्यालयात लोकशाही वातावरण :**

लोकशाही मार्गाने विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. वास्तव अडचणी दूर कराव्यात. विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन सामंजस्यपूर्ण वातावरण निर्माण करावे. त्यांच्या विचारांची कदर करावी.

**१२) मनोविकृत व बालगुन्हेगार मुलांचे प्रश्न :**

मनोविकृत मुलांचा पालकांच्या सहकार्याने अभ्यास करावा. वेळप्रसंगी मनोवैज्ञानिकांचा सल्ला घ्यावा. बालगुन्हेगार मुलांच्या गुन्हेगारीची कारणे समजून घ्यावीत. वेळप्रसंगी गरज पडल्यास त्यांना पालकांच्या सहकार्याने रिमांड होममध्ये दाखल करावे.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांची बेशिस्त समूळ नष्ट करण्यासाठी शिक्षणसंस्था, सामाजिक संस्था, पालक व शासनसंस्था यांनी सहकार्य भावनेने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. देशाची तरुण पिढी बरबाद होऊ नये म्हणून सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे. केवळ शाळा व महाविद्यालयांची ती जबाबदारी आहे, असे मानणे योग्य होणार नाही. असे म्हणतात की, "देशाचे भवितव्य वर्गा वर्गांत घडत असते." हे देशाचे भावी आधारस्तंभ गैरवर्तनाने स्वतःचे जीवन नष्ट तर करणार नाहीत ना? याची काळजी घेतली पाहिजे व त्यासाठी परिणामकारक उपाययोजना राबविली पाहिजे.

तरच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची जी समस्या उद्भवली आहे तिचे निराकरण करणे सोपे जाईल.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1) शिक्षणाचे तत्वज्ञान व समाजशास्त्र, देशमुख (1998), प्रा. एल. जी, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र (1987), पारसनीस डॉ. न. रा, नुतन प्रकाशन, पुणे.
3) भारतातील आजच्या सामाजिक समस्या, (1992), कोंडेकर प्रा. ए. वाय, फडके प्रकाशन.
4) शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान (2007), देशमुख प्रा. एल. जी, फडके प्रकाशन कोल्हापूर.